# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(स्थापना विभाग)

क्रमांक :–344 / आस्थापना                                                    दि. 06/02/2015

## –: परिपत्रक :–

प्रति,

सर्व विभाग प्रमुख/ सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी
महानगरपालिका, नागपूर

विषय :– सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजने अंतर्गत लाभ मिळण्याबाबतची प्रकरणे स्थापना विभागाकडे पाठविण्याबाबत.

संदर्भ :– 1) परिपत्रक क्र. 147/आस्थापना दि. 15/10/2011
2) परिपत्रक क्र. 341/आस्थापना दि. 04/01/2014

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने, नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचारी/अधिकारी हयांना शासन निर्णय क्रमांक वेतन–1109/प्र.क्र. 44/सेवा–3 मंत्रालय, मुंबई, दि. 1 एप्रिल 2010 नुसार दि. 1 ऑक्टोंबर 2006 पासुन "सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना" लागु करण्यांत आलेली आहे.

ही योजना कमाल वेतन बॅन्ड पी. बी.–3 (रू. 15600–39100) + 5400 पर्यंत ग्रेड वेतन घेणा–या सर्व कर्मचारी/अधिकारी हयांना उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयानुसार व या शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार लागु करण्यांत आलेली आहे.

या संदर्भात आस्थापना विभागाचे संदर्भ क्र. 2 वरील परिपत्रकानुसार आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (12/24 वर्ष) पात्र कर्मचारी/अधिका–यांची प्रकरणे आस्थापना विभागात वेळेवर पाठविण्याबाबत निर्देशीत करण्यात आलेले आहे. तरीही असे निदर्शनास आलेले आहे की, काही विभागात कार्यरत कर्मचा–यांची आश्वासित प्रगती योजने अंतर्गतची प्रकरणे आस्थापना विभागात वेळेवर पाठविण्यात येत नाही व त्यामुळे संबंधीत कर्मचा–यांची प्रकरणे पदोन्नती तपासणी समितीपूढे ठेवली जात नाही व संबंधीत कर्मचा–यांना या योजनेचा लाभ दिला जात नाही, याबाबत मा. आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

तेव्हा आपले अधिनस्त कार्यरत व दि. 31/01/2015 पर्यंत पात्र अधिकारी/कर्मचा–यांना, सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजने अंतर्गत स्थापना विभागा मार्फत लाभ देण्यात आलेला नाही, अशा कर्मचा–यांची प्रकरणे विनाविलंब आवश्यक ती सर्व पुर्तता करून (प्रपत्र 'अ'व 'ब', प्रमाणित केलेले सेवापुस्तक, 5 वर्षाचे गोपनीय अहवाल, जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी बाबींची पुर्तता करून) आस्थापना विभागाकडे 7 दिवसाचे आंत पाठविण्यात यावीत, व यापुढे आपले अधिनस्थ कार्यरत कर्मचा–यांचा पदोन्नती/आश्वासित प्रगती योजना बद्दल कॅलेंडर चार्ट तयार करून नियत कालावधीनुसार संबंधीत कर्मचा–यांची पदोन्नती विषयक प्रकरणे आस्थापना विभागाला सादर करावी

06/02/15

सहा. आयुक्त (साप्रवि),
महानगरपालिका, नागपूर